सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

राष्ट्रीय सेवा योजना

गणेशखिंड, पुणे – ४११ ००७

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

डॉ. प्रभाकर देसाई

एम्.ए., पीएच् डी.

संचालक

कार्यालय क्र. : ०२०–२५६२२६८८/८९

: ०२०–२५६२२६९०/९१

: ०२०–२५६२२६९२

: ०२०–२५६९७३४१


रासेयो/२०२२–२३/७०५ दि. ३०/०६/२०२२

प्रति,

मा. प्राचार्य/संचालक

रासेयो संलग्नित महाविद्यालये,

पुणे, अहमदनगर व नाशिक जिल्हा

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

**विषय : वृक्ष लागवड व संवर्धन उपक्रमामध्ये सहभागी होणेबाबत**

महोदय/महोदया

वनांचे महत्व आपण सर्वांनी ओळखले आहे. जगाच्या पाठीवर काही देश असे आहेत, की त्यांची ओळख त्या देशांमध्ये असलेल्या समृद्ध वनांमुळे जगाला झाली आहे. सर्वसाधारणपणे भौगोलिक क्षेत्राच्या ३३ टक्के क्षेत्र वनाखाली असणे पर्यावरण संरक्षणाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे आहे. महाराष्ट्र राज्यात २० टक्क्यांच्या जवळपास क्षेत्र वनाखाली आहे. जागतीक हवामान बदलाच्या पार्श्वभूमीवर विविध नैसर्गिक आपत्तींना आपल्याला सतत सामोरे जावे लागत आहे. महाराष्ट्रात होणाऱ्या वातवरणातील अनिश्चित बदलामुळे व कमी पर्जन्यामुळे दुष्काळ सदृश्य परिस्थिती निर्माण झाली आहे. वृक्ष पृथ्वीवरील वातावरण शुद्ध करण्याबरोबरच पर्यावरणाचा समतोल राखण्यास मदत करतात.

याचेच महत्त्व लक्षात घेऊन विकासार्थ विद्यार्थी यांच्यामार्फत वृक्ष लागवड व संवर्धन उपक्रमाचे आयोजन माहे जुलै महिन्यामध्ये करण्यात आलेले आहे. यामध्ये भारतभरामध्ये एक कोटी वृक्ष लागवड व संवर्धन मोहिम राबवण्यात येणार आहे.

या उपक्रमामध्ये सहभागी होण्याकरिता दिनांक ३० जून ते ५ जुलै पर्यंत सोबत दिलेल्या लिंकद्वारे अथवा क्यूआर कोडद्वारे वृक्षमित्र म्हणून नावनोंदणी करणे आवश्यक आहे व यामध्ये आपली संपूर्ण माहिती भरणे आवश्यक आहे. नावनोंदणी केलेल्या वृक्षमित्रांनी किमान दहा वृक्षांची लागवड व संवर्धन करावयाचे आहे.

तरी आपल्या महाविद्यालयातील जास्तीत जास्त स्वयंसेवक, कार्यक्रम अधिकारी यांना माहे जुलै महिन्यामध्ये वृक्ष लावगवड व संवर्धन उपक्रमामध्ये सहभागी होण्याबाबत प्रोत्साहित करावे. कळावे, ही विनंती.

**संचालक**

**राष्ट्रीय सेवा योजना**

**सोबत : नावनोंदणी लिंक :** http://sfdindia.org/mission_plantation_register **व माहितीपत्रक**

STUDENTS FOR DEVELOPMENT
www.sfdindia.org

# विकासार्थ विद्यार्थी

## पश्चिम महाराष्ट्र प्रदेश

**Students For Development**

## १ कोटी वृक्षारोपण व वृक्षसंवर्धन मोहिम
## वृक्षमित्र होण्यासाठी काय कराल :

**SCAN CODE**

LINK : http://sfdindia.org/mission_plantation_register

**चला तर मग वृक्षमित्र होऊन वृक्षारोपण करुया व पर्यावरणाचे संरक्षण करुया.!!**

संपर्क : 8484835057 | 8888208899